नियमित दिवाणी दावा क्र.८६/२०२३
शिवतेज सह. दूध उत्पादन संस्था विरुध्द
श्रीमती. लक्ष्मी पाटील
CNR:MHSN14-000463-2023

## नि.क्र. ३५ वरील आदेश

**१.** प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचेविरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द होवून कैफियत रेकॉर्डवर घेण्याकरीता दाखल केला आहे. प्रतिवादीतर्फे असे कथन केले आहे की, सदर दाव्यातील प्रतिवादी नं. २ ते ४ यांचे वडील मारुती नाना पाटील वृध्दापकाळाने व आजारी असल्याने दि. २४/०९/२०२३ रोजी मयत झालेले आहेत. तसेच त्यांचे मृत्यूमुळे प्रतिवादी नं. २ ते ४ यांची आई ही देखील मानसिक व शारिरीकदृष्ट्या खचून गेल्याने तेव्हापासून अंथरुणावरती खिळून होती. सदर प्रतिवादी नं. १ ते ४ हे तिची सेवासुश्रुषा व औषधपाणी यामध्ये व्यस्त होते. परंतु, प्रतिवादी नं. २ ते ४ यांची आई श्रीमती राधाबाई मारुती पाटील ही देखील दि. ११/०६/२०२४ रोजी मयत झाली. त्यामुळे सदर दाव्याचे कामी प्रतिवादी नं. १ ते ४ यांना कैफियत दाखल करणेकरीता आवश्यक असणारी कागदपत्रे व माहिती वेळेत जमा करुन वकीलांना देणे शक्य झाले नाही. प्रतिवादी हे शेतकरी कुटुंबातील असून त्यांना मुदतीच्या कायद्याची पुरेशी माहिती नाही. प्रतिवादी यांनी वादीच्या दाव्यास कैफियत दाखल करणेकरीता जाणीवपूर्वक कोणताही विलंब केलेला नव्हता व नाही.

**२.** प्रतिवादी यांना कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होऊन त्यांचेविरुध्द झालेला विना कैफियत हा हुकूम रद्द होऊन प्रतिवादी नं. १ ते ४ यांची कैफियत व म्हणणे दखल करुन घेणे अत्यंत आवश्यक आहे. विना कैफियत असा झालेला हुकूम रद्द न झालेस प्रतिवादी यांचेवरती अन्याय होणार असून त्यांचे पैशाच्या स्वरुपात कधीही न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. तसेच त्यांना कायमस्वरुपी न्यायदानापसून वंचित रहावे लागणार आहे. याउलट, सदर प्रतिवादींची कैफियत दाखल करुन घेतलेस वादीचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही. तसेच विना कैफियत हुकूम रद्द न झालेस दाव्याचे कामी गुंतागुंत

निर्माण होणार आहे. सबब सदर प्रतिवादींचे विरुध्द झालेला विना कैफियत हुकूम रद्द होऊन त्यांची कैफियत व म्हणणे रेकॉर्डवरती आल्यास दाव्याबाबत संपूर्ण सत्य वस्तुस्थिती मे.कोर्टासमोर येणार असून दाव्याचा गुणदोषांवरती निर्णय होण्यास मदतच होणार आहे.

**३.** सबब, सदरकामी वर कथन केले संपूर्ण कायदेशीर कारणास्तव प्रतिवादी नं. १ ते ४ यांना या दाव्याचे कामी कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होऊन मिळावा तसेच या प्रतिवादींचेविरुध्द झालेला विना कैफियत हा हुकूम रद्द करणेत येऊन सदर प्रतिवादी यांची कैफियत दाखल करुन घेणेबाबत योग्य तो आदेश करणेत यावा अशी विनंती केली आहे.

**४.** वादींतर्फे त्यांचे म्हणणे नि.क्र. ३६ वर दाखल करुन त्यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांचा अर्ज व त्यामधील कथन वादीस मान्य व कबूल नाही. प्रतिवादी यांचे अर्जास कोणतेही योग्य व संयुक्तिक कारण नव्हते व नाही. त्यामुळे प्रतिवादी यांचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. प्रतिवादी यांनी नि.क्र. ३५ सोबत कोणतीही स्वतंत्र कैफियत दाखल केलेली नाही. याउलट, प्रतिवादी यांनी नि. क्र. ५ च्या कामी दिलेले म्हणणे कैफियत समजणेत यावी असे कथन केलेले आहे. त्यामुळे प्रतिवादी यांचा हेतू प्रामाणिकपणाचा दिसून येत नाही. प्रतिवादी यांनी सदरचे कृत्य केवळ याकामी विलंब करणेकरीता केलेचे दिसून येत आहे. तसेच सदरच्या विलंबाकरीता अर्जामध्ये कोणतेही स्वतंत्र व संयुक्तिक कारण दिलेले नसल्याने प्रतिवादी यांचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. सबब, प्रतिवादी यांचा नि.क्र. ३५ चा अर्ज नामंजूर करणेत यावा. यदाकदाचित प्रतिवादी यांचा अर्ज मंजूर करणेचा झालेस प्रतिवादी यांचेवरती रक्कम रु. १५,०००/- कॉस्ट करणेत यावी.

**५.** प्रतिवादींचा अर्ज व वादींचे म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रतिवादी प्रकरणात हजर झाल्यानंतर त्यांनी नि. क्र. १८ वर दि. ०२/०८/२०२३ रोजी तूर्तातूर्त ताकीद अर्जास म्हणणे दाखल केले. तदनंतर दोन्ही बाजुंचा तूर्तातूर्त ताकीद अर्जावर युक्तिवाद होऊन ताकीद अर्ज दि. ०४/११/२०२३ रोजी मंजूर करण्यात आला.

तदनंतर प्रतिवादीतर्फे कैफियत देणेत आली नाही अथवा त्यासाठी मुदत अर्ज देखील देण्यात आला नाही. दि. १९/०६/२०२४ रोजी वादीतर्फे दिलेल्या अर्जावरील आदेशानुसार प्रतिवादींविरुध्द कैफियत नाही चा आदेश पारीत करण्यात आला. तदनंतर दि. २३/०७/२०२४ रोजी प्रतिवादींतर्फे प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला व ताकीद अर्जास त्यांनी दिलेले म्हणणे हिच कैफियत असल्याबाबत पुरसीस दाखल केली. प्रतिवादींनी दि. १४/०६/२०२३ रोजी प्रकरणात हजर होऊन देखील जवळपास एक वर्ष कैफियत दाखल केली नाही. तसेच, मुदतीचा अर्ज देखील दाखल केला नाही. वादीतर्फे प्रतिवादीच्या अर्जातील कथने नाकारुन विलंबाकरीता संयुक्तिक कारण नसल्याचे कथन केले आहे. मात्र, प्रतिवादीतर्फे झालेल्या विलंबाबाबत अर्जामध्ये कथने केलेली आहेत.

**६.** प्रस्तुतचा दावा निरंतर मनाई, वाटप व हक्कज्ञापनासाठी दाखल केलेला आहे. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींचे देखील हक्क हितसंबंध आहेत. प्रतिवादींनी ताकीद अर्जावर दिलेले म्हणणे ही त्यांची कैफियत असल्याबाबत पुरसीस प्रस्तुत अर्जासोबत दिलेली आहे. त्यामुळे त्यांना कैफियत देण्याची संधी दिल्यास न्यायदानासाठी त्याचा उपयोग होणार आहे. त्यामुळे उभय पक्षांपैकी कोणाचेही नुकसान होणार नाही. दावा गुणदोषांवर चालवून निकाली करणेस मदत होणार आहे. मात्र प्रतिवादींतर्फे झालेल्या विलंबाची भरपाई म्हणून प्रतिवादींनी वादींना र.रु. १,५००/- कॉस्ट देवून अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज नि.क्र. ३५ प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी वादींना र.रु. १,५००/- कॉस्ट म्हणून देण्याच्या अटींवर मंजूर करण्यात येतो.

२. कॉस्ट रक्कम दिलेनंतर प्रतिवादी नं. १ ते ४ यांची पुरसीस /कैफियत रेकॉर्डवर घेण्यात यावी.

DESAI VINAYA ATMARAM

Digitally signed by DESAI VINAYA ATMARAM
Date: 2024.09.09 17:11:19 +0530

शिराळा (**व्ही. ए. देसाई**)

दिनांक ०९/०९/२०२४ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शिराळा.

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | M.S. Gondkar |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 09/09/2024 |
| order signed by the Presiding Officer on | : | 09/09/2024 |
| order uploaded on | : | 10/09/2024 |